भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर

**ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur**

An ISO 9001:2015 Certified Organisation

# कापूस हंगाम २०२४ – २५ साप्ताहिक:
# २७ वा पीक सल्ला १० डिसेंबर ते १६ डिसेंबर २०२४

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस (मिमी) | | | | | पडणाऱ्या पावसाचा अंदाज (मिमी) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | डिसेंबर | | | | | डिसेंबर | | | | |
| | | 06 | 07 | 08 | 09 | 10 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
|  | धुळे | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नंदुरबार | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | जळगाव | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अहमदनगर | 9.4 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | औरंगाबाद | 0 | 2.6 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | जालना | 0 | 2.5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | बीड | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नांदेड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | परभणी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | हिंगोली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | बुलढाणा | 2.2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अकोला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | वाशीम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अमरावती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | यवतमाळ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | वर्धा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नागपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | चंद्रपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | 0.1 to 2.4 मिमी | 2.5 to 15.5 मिमी | 15.6 to 64.4 मिमी | 64.5 to 115.5 मिमी | 115.6 to 204.4 मिमी |
|---|---|---|---|---|---|
| पावसाची श्रेणी | खूप हलका पाऊस | तुरळक पाऊस | मध्यम स्वरूपाचा पाऊस | मुसळधार पाऊस | अति मुसळधार पाऊस |

**पीक परिस्थिती:**

**अकोला** येथे पीक बोंड फुटणे/ कापूस वेचणीच्या टप्प्यावर आहे. बहुतांश शेतात कापूस वेचणी सुरु आहे. अहवाल सप्ताहादरम्यान कीटकनाशक फवारणी करण्यात आली. रस शोषक कीटकांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी खाली आढळून आला आहे. काही शेतात बुरशीजन्य पानांच्या डागांचा प्रादुर्भाव आढळून आलेला आहे.

**नांदेड** येथे पीक संपुष्टात आले आहे.

**राहुरी** येथे पीक वेचणीच्या टप्प्यावर आहे. बहुतेक शेतात कापूस वेचणी पूर्ण झाली आहे. शेवटची कापूस वेचणी सुरु आहे. इतर रस शोषक कीटकांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी खाली आढळून आलेला असून अनेक ठिकाणी पांढरी माशी व गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर आढळलेला आहे. काही शेतात टीएसव्ही (३-5%), राखाडी बुरशी (३-४%) आणि बोंडसड (१-२%) चा प्रादुर्भाव नोंदवला गेला.

**पीक सल्ला:**

**अकोला येथे,** शेतकऱ्यांनी स्वच्छ कापूस वेचणीला प्राधान्य द्यावे. वेचलेला कापूस कापसाच्या वाणा प्रमाणे वेगळा ठेवावा. १% युरिया आणि १% मॅग्नेशियम सल्फेटची फवारणी बोंडाच्या विकासाच्या अवस्थेत करावी जेणेकरून नंतरच्या

पिकाच्या अवस्थेत कपाशी लाल होणार नाही. कापूस साठवण्याआधी वाळवावा आणि वैयक्तिक वेचणी व संकरित कापूस स्वतंत्रपणे साठवावा. डिसेंबरच्या शेवटी पीक काढून टाकावे तसेच शेतातून पिकांचे अवशेष गोळा करून नष्ट करावे. सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास रब्बी पीक रोटेशन म्हणून घ्यावे.

**नांदेड येथे,** कापूस साठवण्याआधी वाळवावा आणि वैयक्तिक वेचणी व संकरित कापूस स्वतंत्रपणे साठवावा. डिसेंबरच्या शेवटी पीक काढून टाकावे तसेच शेतातून पिकांचे अवशेष गोळा करून नष्ट करावे. सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास रब्बी पीक रोटेशन म्हणून घ्यावे.

**राहुरी येथे** कापूस साठवण्याआधी वाळवावा आणि वैयक्तिक वेचणी व संकरित कापूस स्वतंत्रपणे साठवावा. सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास गहू किंवा दुसरे पीक रोटेशन म्हणून घ्यावे. शेतातून रोगट बोंडे आणि पिकांचे ढिगारे गोळा करून नष्ट करावे. डिसेंबरच्या शेवटी पीक काढून टाकावे.